जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/१३३८१/२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :-१८/११/२०२४

**विषय :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे बेकायदेशीर जमाव न जमवणे आणि सार्वजनिक सभा/बैठका न घेणे बाबत...**

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र.ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहिता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदार संघात मतदान दिनांक २०/११/२०२४ रोजी होणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ मतदार संघात विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे SOP FOR LAST 72 HOURS यातील मुद्दा क्र. 4.1.1 अन्वये मतदान प्रक्रिया पुर्ण होण्याच्या ४८ तास अगोदर पासुन मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खालील नमुद कृत्ये न करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी मतदान प्रक्रिया पुर्ण होण्याच्या ४८ तास अगोदर पासुन बेकायदेशीर जमाव जमवणे, सार्वजनिक सभा बैठका घेणे यास प्रतिबंध करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) २०२३ चे कलम १६३ पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रापैकी १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ या विधानसभा मतदार संघ क्षेत्रात दिनांक १८/११/२०२४ चे १८.०० वा. पासून ते दिनांक २०/११/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) बेकायदेशीर जमाव करणे.
२) सार्वजनिक सभा / बैठका घेणे.
३) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोक एकत्र येणे.
४) पदयात्रा काढणे.

वरील अ.नं. १ ते ४ कृतीस प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.१८/११/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :-१८/११/२०२४

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर